फोन. न. (2462) 229242,, 229243
फॅक्स नं. (2462) 229574

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,**
"ज्ञानतीर्थ" विष्णुपूरी.
**नांदेड - ४३१ ६०६.**

Phone : (02462) 229242, 229243
Fax (02462) 229574

**SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY,**
"Dnyanteerth" Vishnupuri
**NANDED – 431 606 (MH.)**

जावक क्रं. शैक्षणिक / परिपत्रक / 2011–2012 / 2314,

Date January 12, 2012

प्रति,
मा. प्राचार्य/प्राचार्या
सर्व संलग्नीत कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये,
**प्रस्तुत विद्यापीठ.**

विषय : कंत्राटी सेवा काळात शैक्षणिक अर्हता धारण करणा-या व यापुर्वी परिविक्षाधीन मान्यता दिलेल्या सहाय्यक प्राध्यापकांना कंत्राटी काळातील सेवा परिविक्षाधीन गृहित धरून पुढे नियमित मान्यता देणे बाबत.

संदर्भ : या कार्यालयाचे पत्र क्र.शैक्षणिक/परिपत्रक/२०११-१२/२२०१, दिनांक ३-०१-२०१२.

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्रास अनुसरुन आपणास स्पष्टपणे कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयात ज्या सहाय्यक प्राध्यापकांनी कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक म्हणून सेवा केलेली आहे आणि त्यांनी कंत्राटी सेवाकाळात शैक्षणिक अर्हता धारण केलेली आहे. अशा सहाय्यक प्राध्यापकांच्या बाबतीत शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २००४/(९७/०४)/विशि-४ उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय विस्तार भवन, मुंबई, दिनांक ७ जानेवारी २००५ मध्ये असे उल्लेखीत आहे की, विहित शैक्षणिक अर्हता धारण केलेल्या व विद्यापीठ कार्यालयातील तरतुदीप्रमाणे विहित निवड समिती मार्फत निवड झालेल्यांना नियमित वेतन श्रेणीत सामावून घेवून त्यांची नियुक्ती झाल्यापासून त्यांचा दोन वर्षाचा कालावधी परिविक्षाधीन कालावधी समजण्यात यावा अशी तरतुद आहे. त्यामुळे अर्हता धारण केलेल्या सहाय्यक प्राध्यापकांची सेवा रुजू दिनांकापासून धरणे अपेक्षित आहे.

तरी कंत्राटी सेवाकाळात शैक्षणिक अर्हता धारण केलेल्या ज्या सहाय्यक प्राध्यापकांना अर्हता धारणकेलेल्या दिनांकापासून परिविक्षाधीन कालावधीकरीता मान्यता दिलेली आहे. अशाच सहाय्यक प्राध्यापकांचे प्रस्ताव कंत्राटी कालावधी परिविक्षाधीन गृहीत धरुन पुढे नियमित करण्यासाठी विहित कागदपत्रासह पंधरा दिवसाच्या आत सादर करावेत. कंत्राटी सेवाकाळात खंड पडलेले तथा ज्यांना विद्यापीठाची परिविक्षाधीन मान्यता नाही त्यांचे प्रस्ताव कृपया पाठवू नये, कळावे.

आपला,
स्वाक्षरित/-
**उपकुलसचिव**
शैक्षणिक विभाग